## संपादकीय

सन्माननीय आजीव सभासद व वाचकांना सविनय प्रणाम .'नवज्योत' या आंतरविद्याशाखीय संशोधन पत्रिकेच्या सहाव्या वर्षातील पहिल्या अंकाच्या प्रस्तुतीकरणाचा आंनद होत आहे. तो केवळ आपल्या पाठबळाच्या व सहकार्याच्या जोरावरच! सतत पाच वर्ष संशोधन पत्रिकेचे कामकाज आपल्या पाठबळाच्या जोरावर सफल होवू शकले आहे.

सदर अंकामध्ये राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, शारीरीक शिक्षण शास्त्र, समाजशास्त्र, मराठी, हिंदी, इंग्रजी, इत्यादी विविध विषयावर आलेल्या लेखांची मांडणी केली असून प्राध्यापक .संशोधक विद्यार्थी यांनी सखोल सविस्तर व विवेचनपूर्ण मांडणी विविध विषयावर केली आहे. यातून वाचकांना अभ्यासपूर्ण माहीतीचा खजीना उपलब्ध होणार असून वाचकांच्या ज्ञानात चौकस बुध्दीत निश्चीत भर पडेल.

संशोधनासाठी प्रेरणा उत्तेजन व व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे काम 'नवज्योत' ने सात्यतपूर्ण केले आहे. त्यामुळे सामाजीक पटलावर बदल घडवून आणणा-या अभ्यासपूर्ण विषयांची या विश्वासासह सदर अंक मी आपल्या पुढे सविनय सादर करतो.

आपला

डॉ.प्यारेलाल सुर्यवंशी.